**SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR-416004, MAHARASHTRA**
PHONE - EPABS-0091-0231-2609000 FAX NO. -0091-0231-2691533 & 0091-0231-2692333
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर–416 004 महाराष्ट्र
**University WEBSITE : www.unishivaji.ac.in**

**Estd : 1962**
**"A++" Accredited by**
**NACC (2021) with CGPA 3.52**

**Prof. Dr. R. V. Gurav**
**Director, Students' Development**
**Phone – (0231) 2609175, 2609475**
**Email: dsw@unishivaji.ac.in**

संदर्भक्रं. शिवाजी वि/विद्यार्थी विकास/314 दि. 11/06/2021

प्रति,

मा. प्राचार्य/प्राचार्या,
सर्व संलग्न महाविद्यालये व सर्व मान्यताप्राप्त शिक्षण संस्था, व
मा. विभागप्रमुख, पदव्युत्तर अधिविभाग, कोल्हापूर.

**विषय :– ऑनलाईन जिल्हास्तरीय व मध्यवर्ती युवा महोत्सव 2020–2021.**

महोदय/महोदया,

शिवाजी विद्यापीठाचा 40 वा युवा महोत्सव ऑनलाईन पध्दतीने आयोजित केला जाणार असून प्रथम जिल्हास्तरीय व नंतर मध्यवर्ती याप्रमाणे सदर युवा महोत्सवातील स्पर्धा आयोजित केल्या जाणार आहेत.

ऑनलाईन युवा महोत्सव आयोजनाच्या अनुषंगाने कोल्हापूर, सांगली व सातारा या जिल्हयातील महाविद्यालयातील सांस्कृतिक समन्वयक तसेच विद्यार्थी यांचेसाठी जिल्हास्तरीय कार्यशाळा खालीलप्रमाणे आयोजक महाविद्यालयामार्फत ऑनलाईन पध्द्तीने आयोजित करण्यात येईल.

| अं कं. | जिल्हा | आयोजक महाविद्यालयाचे नाव | दिनांक व वेळ |
|---|---|---|---|
| 1 | कोल्हापूर | कला,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, गडहिंग्लज | दि. 21/06/2021 स. 10. 30 ते दु. 12.00 |
| 2 | सांगली | विलिंग्डन कॉलेज, सांगली | दि. 21/06/2021 दु. 12.00 ते दु. 1.30 |
| 3 | सातारा | दहिवडी कॉलेज, दहिवडी | दि. 21/06/2021 दु. 1.30 ते दु. 3.00 |

जिल्हास्तरीय व मध्यवर्ती युवा महोत्सव खालीलप्रमाणे यजमान महाविद्यालयामार्फत ऑनलाईन पध्द्तीने आयोजित करणेत येतील.

| अ.नं. | जिल्हा | यजमान महाविद्यालय | दिनांक |
|---|---|---|---|
| 1. | **कोल्हापूर** | न्यू कॉलेज, कोल्हापूर | दि. 05, 06 व 07 जुलै, 2021 |
| 2 | **सांगली** | मालती वसंतदादा पाटील कन्या महाविद्यालय, इस्लामपूर, सांगली | दि. 05, 06 व 07 जुलै, 2021 |
| 3. | **सातारा** | बाळासाहेब देसाई कॉलेज, पाटण | दि. 05, 06 व 07 जुलै, 2021 |
| 4. | **मध्यवर्ती** | वेणूताई चव्हाण कॉलेज, कराड, | दि. 08, 09 व 10 जुलै, 2021 |

**तरी वरीलप्रमाणे ऑनलाईन युवा महोत्सव कार्यशाळा तसेच जिल्हास्तरीय व मध्यवर्ती युवा महोत्सवाच्या निश्चित करण्यात आलेल्या तारखा बाबत नोंद घ्यावी व आपल्या महाविद्यालच्या विद्यार्थ्यांचा संघ बनवून युवा महोत्सवामध्ये सहभागी व्हावे.**

**सुचना:–**

1. या युवा महोत्सवामध्ये सहभागी होण्यासाठीचा प्रवेशिका अर्ज **https://forms.gle/sLFPGYeysD92zWjw6** या लिंकवरती ठेवण्यात आलेला आहे.
2. ऑनलाईन जिल्हास्तरीय व मध्यवर्ती युवा महोत्सवामध्ये सहभागी होण्यासाठीच्या प्रवेशिका ऑनलाईन पध्द्तीने योग्य शुल्कासह वरील दिलेल्या लिंकवरती दि. 25/06/2021 पर्यंत अपलोड करण्यात याव्यात. यानंतर आलेल्या प्रवेशिकांचा विचार केला जाणार नाही.
3. ऑनलाईन युवा महोत्सव कार्यशाळा तसेच प्रत्यक्ष युवा महोत्सवाची लिंक संबधित आयोजक महाविद्यालयाकडून सर्व सहभागी महाविद्यालयांना स्वतंत्रपणे कळविणेत येईल.
4. जिल्हास्तरीय व मध्यवर्तीयुवा महोत्सवाचे वेळापत्रक सर्व महाविद्यालयांना यथावकाश ई–मेलद्वारे पाठविणेत येईल.
5. परिक्षकांचा निर्णय अंतिम राहील, याबाबत कोणत्याही प्रसार माध्यमाकडे तक्रार करता येणार नाही. अशी तक्रार झालेस सदर महाविद्यालयाचे वर्तन बेशिस्तीचे असल्याचे समजण्यात येईल.

आपला विश्वासू,

-Sd-
संचालक
विद्यार्थी विकास

सोबतः ऑनलाईन युवा महोत्सवाची नियमावली.

# शिवाजी विद्यापीठ,

# कोल्हापूर

# विद्यार्थी विकास विभाग

# 40 वा युवा महोत्सव

# (ऑनलाईन)

# सन 2020–2021

# नियमावली माहितीपुस्तिका

## प्रस्तावना :

सध्या देशभरात असलेल्या कोविड –19 च्या साथरोगाचा तसेच शासनाने घालून दिलेल्या साथरोग प्रतिबंधक नियमांचा विचार करता शिवाजी विद्यापीठाचा युवा महोत्सव (सन 2020–2021) पारंपारिक पद्धतीने आयोजित करणे अशक्य आहे. तथापि विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देण्याच्या उद्देशाने या वर्षीचा युवा महोत्सव ऑनलाईन पद्धतीने Electronic Platform च्या माध्यमातून घेण्याचे निश्चित केले आहे. तरी शिवाजी विद्यापीठाशी संलग्नीत महाविद्यालयातील तसेच विद्यापीठ अधिविभागातील विद्यार्थ्यांनी online पद्धतीने Electronic Platform च्या माध्यमातून युवा महोत्सवामध्ये सहभागी व्हावे. विद्यार्थ्यांचा सहभाग सहज व सोपा व्हावा यासाठी विद्यार्थी त्यांच्या त्यांच्या ठिकाणावरुन यामध्ये सहभागी होऊ शकतात. त्यासाठी त्यांनी महाविद्यालयामध्ये किंवा इतरत्र कुठेही एकत्र येऊ नये. तसेच उपरोक्त युवा महोत्सवामध्ये सहभागी होणा–या सर्व स्पर्धकांनी कोविड–19 विषाणूच्या प्रार्दुभावाच्या अनुषंगाने शासन निर्देशाचे काटेकोर पालन करावे. त्यासाठी सहभागी महाविद्यालयांनी योग्य ती खबरदारी घ्यावी.

## ऑनलाईन युवा महोत्सव संयोजन उद्देश

महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या विविध कला गुणांना प्रोत्साहन देण्याच्या हेतूने आणि त्यांच्यात संघ भावना येवून एकमेकांच्या गुण वैशिष्टयाबद्दल आदर निर्माण व्हावा तसेच सांस्कृतिक कलाप्रकारामध्ये सर्वोकृष्ट कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांचा विद्यापीठ संघामध्ये समावेश करून त्यांना राज्य व राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धांमध्ये सहभागी होण्याची संधी मिळावी यादृष्टीने युवा महोत्सवामध्ये विविध स्पर्धा आयोजित करण्यात येतात.

युवा महोत्सवाच्या सुनियोजित आयोजनाकरिता (जिल्हास्तरीय व मध्यवर्ती) तसेच राज्यस्तरीय, विभागीय, राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय युवा महोत्सव/संबंधित स्पर्धा (कव्वाली) यासाठी संघनिवड, प्रशिक्षण इ. च्या मार्गदर्शनासाठी व समन्वयासाठी मा. कुलगुरूंचे अध्यक्षतेखाली व नामनिर्देशनानुसार प्रतिवर्षी खालीलप्रमाणे युवा महोत्सव समितीचे गठण करण्यात येईल.

मा. कुलगुरू (अध्यक्ष)
मा. प्र–कुलगुरू
मा. कुलसचिव
मा. संचालक, परिक्षा व मुल्यमापन मंडळ
मा. वित्त व लेखाधिकारी
व्यवस्थापन परिषद सदस्य (2)
प्राचार्य/प्राध्यापक (4)
संगीत व नाटयशास्त्र अधिविभागातील प्राध्यापक (1)
युवा महोत्सव जिल्हा समन्वयक (3)
मा. संचालक, राष्ट्रीय सेवा योजना
संचालक, विद्यार्थी विकास (सचिव)

## स्पर्धेसाठी नियम

1. महाविद्यालयांनी आपल्या स्पर्धकांची नावे एकाच प्रवेश अर्जात लिहून प्रवेशिका दोन प्रतीमध्ये संचालक, विद्यार्थी विकास, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांना योग्य त्या शुल्काच्या भरणा पावतीसह (बॅंक चलनासह) पाठवावयाच्या आहेत. प्रवेश शुल्क भरल्याशिवाय प्रवेशिका स्विकारल्या जाणार नाहीत.(प्रवेश अर्जाचा नमूना सोबत जोडला आहे).
2. प्रत्येक वैयक्तिक स्पर्धेसाठी रु. 100/– इतके प्रवेश शुल्क भरावयाचे आहे. तरी स्पर्धेत सहभागी होणा–या प्रत्येक महाविद्यालयाने वैयक्तिक स्पर्धेतील सहभागी कलाप्रकारांच्या संख्येनुसार होणारी

प्रवेश शुल्काची एकूण रक्कम मा. वित्त व लेखााधिकारी, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांचे नांवे बॅक खात्यामध्ये जमा करावी.

3. जिल्हास्तरीय युवा महोत्सवात होणाऱ्या प्रत्येक स्पर्धेसाठी **किमान चार** स्पर्धकांचे प्रवेश अर्ज येणे आवश्यक आहे. त्यापेक्षा कमी स्पर्धक आल्यास सर्व स्पर्धकांना थेट मध्यवर्ती युवा महोत्सवामध्ये प्रवेश दिला जाईल.
4. सर्व स्पर्धांसाठीच्या प्रवेशिका या नियमावलीत दिलेल्या विहित नमून्यात पाठवावयाच्या आहेत.
5. महाविद्यालय / विद्यापीठ अधिविभाग यांनी एका वैयक्तिक स्पर्धेसाठी एकाच स्पर्धक विद्याथ्याचे किंवा विद्यार्थीनींचे नाव पाठवावयाचे आहे.
6. कलाकारांचे शिकत असलेले वर्ग व जन्मतारीख प्रवेशिकेत नोंदविणे आवश्यक आहे.

## स्पर्धकांना सुचना :

1. कोविड–19 विषाणूच्या प्रार्दुभावाच्या अनुषंगाने शासन निर्देशाचे काटेकोर पालन करून संबंधित स्पर्धकांनी उपरोक्त युवा महोत्सवामध्ये सहभागी व्हावे.
2. सर्व विद्यार्थी–विद्यार्थीनींनी सर्व कार्यक्रमांना सादरीकरणासाठी ऑनलाईन वेळेवर उपस्थित राहिले पाहिजे.
3. स्पर्धा सुरू होण्यापूर्वी स्पर्धकांनी ऑनलाईन दहा मिनिटे अगोदर तयारीत रहावे.
4. महाविद्यालयाचे कोड क्रमांक आणि स्पर्धाप्रकारानुसार सादरीकरणाचे क्रम विद्यापीठ युवा महोत्सव समितीकडून स्पर्धेपूर्वी दिले जातील. स्पर्धकांना लॉटमध्ये जाहीर झालेल्या क्रमांकानेच ऑनलाईन सहभागी करुन घेण्यात येईल. ऐनवेळी यामध्ये कोणताही बदल केला जाणार नाही.
5. कोणत्याही प्रकारच्या नियमबाहय वा बाधक गैर / बेशिस्त वर्तनाबद्दल विद्यार्थ्यांस शासन केले जाईल व त्याची माहिती संबधित प्राचार्यांना व विद्यापीठास कळविली जाईल.
6. विद्यार्थी / विद्यार्थीनींनी कोणत्याही प्रकारच्या तक्रारी, संबधित संघ व्यवस्थापक प्राध्यापकामार्फत युवा महोत्सव समितीकडे लेखी सादर कराव्यात. अन्यथा तक्रारींची दखल घेतली जाणार नाही.
7. परीक्षक मंडळाचे निर्णय सर्वांना अंतिम व बंधनकारक राहतील.
8. स्पर्धकांनी दिलेल्या अनुक्रमांकाचे बॅचेस तयार करुन त्यांनी ऑनलाईन स्पर्धेच्या वेळी स्पष्ट दिसतील असे लावलेच पाहिजेत.
9. कोणत्याही वादग्रस्त विषयाबाबत विद्यार्थी / संघव्यवस्थापक / महाविद्यालयास प्रसार माध्यमाकडे जाता येणार नाही. ते बेशिस्तीचे वर्तन समजले जाईल व अशा महाविद्यालयांवर विद्यापीठामार्फत योग्य ती कारवाई केली जाईल.
10. **साहित्य** – स्पर्धेत भाग घेण्यासाठी लागणारी सर्व वाद्ये व इतर साहित्य तसेच साथीदार यांची व्यवस्था महाविद्यालयाने करावयाची आहे.
11. **पात्रता** – 1 जूलै,2020 रोजी ज्याचे वय 25 वर्षाहून कमी असेल अशा शिवाजी विद्यापीठ क्षेत्रातील सर्व संलग्न महाविद्यालयातील / संस्थेतील व शिवाजी विद्यापीठातील सर्व अधिविभागामध्ये **पूर्णवेळ आणि नियमित** शिकत असणाऱ्या व कमीत कमी एक वर्ष पूर्णवेळ मुदतीच्या वर्गातील विद्यार्थ्याना युवक महोत्सव स्पर्धामध्ये भाग घेता येईल. प्रोव्हिजनल ॲडमिशन मान्य केले जाणार नाही. तसेच सहभागी होणाऱ्या विद्यार्थी अगर विद्यार्थीनीने विद्यापीठात अगर महाविद्यालयात / संस्थेत **पदवी अथवा पदवीकेसाठी प्रवेश घेऊन 7 वर्षापेक्षा अधिक काळ उलटून गेला असल्यास** अशा विद्यार्थी अगर विद्यार्थीनींना स्पर्धेत भाग घेता येणार नाही. पुर्णवेळ नोकरदार विद्यार्थी / विद्यार्थीनींना स्पर्धक म्हणून भाग घेता येणार नाही.
12. **ओळख पत्र** – ऑनलाईन युवा महोत्सवात भाग घेणाऱ्या प्रत्येक व्यक्तीजवळ (संघ व्यवस्थापक व स्पर्धक यांचे जवळ) संबधीत महाविद्यालयचे / संस्थेचे / डिपार्टमेंटचे फोटोसह विहीत नमुन्यातील प्राचार्याच्या / विभागप्रमुखांच्या सहीचे **ओळखपत्र व चालू वर्षाची फी भरणा पावती** असणे आवश्यक आहे.
13. **शिस्त** – ऑनलाईन स्पर्धेमध्ये सर्व स्पर्धकांनी शिस्तीचे काटेकोर पालन करावयाचे आहे.

14. **संघ व्यवस्थापक–** प्रत्येक महाविद्यालयातील संघाबरोबर एक प्राध्यापक किंवा एक प्राध्यापिका संघ व्यवस्थापक असणे आवश्यक आहे. **संघ व्यवस्थापक प्राध्यापकांनी आपल्या संघातील स्पर्धकांना स्पर्धेच्या नियोजित वेळेमध्ये ऑनलाईन सहभागाची व्यवस्था करावयाची आहे.** संघ प्रमुख प्राध्यापक/प्राध्यापिका यांनी आपला महाविद्यालयीन संघ व युवा महोत्सव संयोजन समिती यांच्यातील संपर्क अधिकारी म्हणून काम पहावयाचे आहे.

15. **तज्ञ परिक्षक नियुक्ती** – ऑनलाईन जिल्हास्तरीय व मध्यवर्ती युवा महोत्सवातील विविध स्पर्धांच्या परीक्षणासाठी तज्ञ परीक्षकांची नियुक्ती विद्यापीठ युवा महोत्सव समितीकडून करणेत येईल यामध्ये कोणासही हस्तक्षेप करता येणार नाही.

## ऑनलाईन जिल्हास्तरीय युवा महोत्सव नियमावली

1. अ) प्रत्येक स्पर्धेसाठी किमान <u>चार प्रवेशिका</u> येणे आवश्यक आहे. यापेक्षा कमी प्रवेशिका आल्यास या स्पर्धकांना ऑनलाईन मध्यवर्ती युवा महोत्सवात थेट प्रवेश दिला जाईल.
   ब) प्रत्येक महाविद्यालयास प्रत्येक स्पर्धेसाठी फक्त एकच स्पर्धक सहभागी करता येईल.
2. युवा महोत्सवातील प्रत्येक स्पर्धेसाठी स्वतंत्र प्रवेशिका सोबत दिलेल्या विहीत नमुन्यात संयोजक समितीने निर्धारीत केलेल्या मुदतीमध्ये **संचालक, विद्यार्थी विकास, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर** यांना पाठवाव्यात. या निर्धारीत वेळेनंतर आलेल्या प्रवेशिकांचा कोणत्याही परिस्थितीत विचार केला जाणार नाही.
2. **प्रवेश शुल्क** : विद्यापीठाने युवा महोत्सवामध्ये भाग घेण्याकरीता प्रत्येक स्पर्धेसाठी रू. 100/– इतके प्रवेश शुल्क ठरविले आहे. जेवढया स्पर्धा प्रकारामध्ये सहभाग घ्यावयाचा आहे त्यानुसार महाविद्यालयाने प्रवेश शुल्क विद्यापीठाचे बॅंक खात्यामध्ये भरणा करुन त्याचे मुळ चलन प्रवेशिका सोबत पाठविणे आवश्यक आहे.
4. प्रवेश शुल्क वेळेत विद्यापीठाकडे पाठविल्याशिवाय संबंधित महाविद्यालयाच्या स्पर्धकांना ऑनलाईन स्पर्धेमध्ये भाग घेण्यास परवानगी देण्यात येणार नाही.
5. जिल्हास्तरीय युवा महोत्सवाचा निकाल सर्व स्पर्धा संपल्यानंतर सर्व महाविद्यालयांना ई–मेल द्वारे कळविण्यात येईल.

### जिल्हास्तरीय युवा महोत्सव – स्पर्धा प्रकार

1. वक्तृत्व मराठी (ELOCUTION MARATHI)
3. वक्तृत्व हिंदी (ELOCUTION HINDI)
4. वक्तृत्व इंग्रजी (ELOCUTION ENGLISH)
5. सुगमगायनः (भावगीत/भक्तीगीते/मराठी गझल/अभंग इ.) (LIGHT VOCAL)
6. शास्त्रीय गायन (Classical Vocal)
7. पाश्चिमात्य एकलगायन (Western Solo)
8. शास्त्रीय सुरवाद्य (Classical Instumental Solo-Non Percussion) हिंदूस्थानी
9. शास्त्रीय तालवाद्य (Classical Instumental Solo-Percussion) हिंदूस्थानी
10. पाश्चिमात्य एकल वाद्यवादन ( Western Instrumental)
11. शास्त्रीय नृत्य (Classical Dance)
12. नकला (MIMICRY)
13. एकपात्री अभिनय ( Mono Acting )
14. व्यंगचित्र (Cartooning)
15. भित्तीचित्र निर्मिती (Poster Making)
16. स्थळ चित्र (On the Spot Painting)
17. कातरकाम (Collage)
18. मातीकाम मातीपासून प्रतिकृत्ती निर्मिती ( Clay Modelling )
19. रांगोळी (Rangoli )
20. मेहेंदी (Mehendi)

# जिल्हास्तरीय युवा महोत्सव विविध स्पर्धा प्रकारांसाठी नियमावली

1. वक्तृत्व मराठीः
   1. ही स्पर्धा मराठी या भाषेत स्वतंत्रपणे आयोजित केली जाईल.
   2. या स्पर्धेसाठी प्रत्येक महाविद्यालयातून फक्त एकाच स्पर्धकला भाग घेता येईल.
   3. ही स्पर्धा आभासी पध्दतीने घेण्यात येईल.
   4. प्रत्येक स्पर्धकाने कॅमे—यासमोरच आपली कलाकृती सादर करावी.
   5. प्रत्येक स्पर्धकास किमान 4 मिनिटांचा व कमाल 5 मिनीटांचा वेळ बोलण्यास दिला जाईल. स्पर्धकास जास्तीत जास्त 15 सेकंद अधिकचा वेळ मान्य करण्यात येईल त्यापेक्षा अधिकचा वेळ लागल्यास स्पर्धक स्पर्धेतून बाद केला जाईल.
   6. प्रत्येक भाषेतील स्पर्धा स्वतंत्र असल्याने प्रत्येक भाषेसाठी स्वतंत्र प्रवेशिका पाठवावी.
   7. स्पर्धेसाठी युवा महोत्सव समितीने ठरविलेले/निवडलेले 5 विषय स्पर्धेच्या आधी कळविले जातील व त्यामधूनच स्पर्धकास विषय स्वतः निवडता येईल.
2. वक्तृत्व हिंदी :
   1. ही स्पर्धा हिंदी या भाषेत स्वतंत्रपणे आयोजित केली जाईल.
   2. या स्पर्धेसाठी प्रत्येक महाविद्यालयातून फक्त एकाच स्पर्धकला भाग घेता येईल.
   3. ही स्पर्धा आभासी पध्दतीने घेण्यात येईल.
   4. प्रत्येक स्पर्धकाने कॅमे—यासमोरच आपली कलाकृती सादर करावी.
   5. प्रत्येक स्पर्धकास किमान 4 मिनिटांचा व कमाल 5 मिनीटांचा वेळ बोलण्यास दिला जाईल. स्पर्धकास जास्तीत जास्त 15 सेकंद अधिकचा वेळ मान्य करण्यात येईल त्यापेक्षा अधिकचा वेळ लागल्यास स्पर्धक स्पर्धेतून बाद केला जाईल.
   6. प्रत्येक भाषेतील स्पर्धा स्वतंत्र असल्याने प्रत्येक भाषेसाठी स्वतंत्र प्रवेशिका पाठवावी.
   7. स्पर्धेसाठी युवा महोत्सव समितीने ठरविलेले/निवडलेले 5 विषय स्पर्धेच्या आधी कळविले जातील व त्यामधूनच स्पर्धकास विषय स्वतः निवडता येईल.
3. वक्तृत्व इंग्रजी :
   1. ही स्पर्धा इंग्रजी या भाषेत स्वतंत्रपणे आयोजित केली जाईल.
   2. या स्पर्धेसाठी प्रत्येक महाविद्यालयातून फक्त एकाच स्पर्धकला भाग घेता येईल.
   3. ही स्पर्धा आभासी पध्दतीने घेण्यात येईल.
   4. प्रत्येक स्पर्धकाने कॅमे—यासमोरच आपली कलाकृती सादर करावी.
   5. प्रत्येक स्पर्धकास किमान 4 मिनिटांचा व कमाल 5 मिनीटांचा वेळ बोलण्यास दिला जाईल. स्पर्धकास जास्तीत जास्त 15 सेकंद अधिकचा वेळ मान्य करण्यात येईल त्यापेक्षा अधिकचा वेळ लागल्यास स्पर्धक स्पर्धेतून बाद केला जाईल.
   6. प्रत्येक भाषेतील स्पर्धा स्वतंत्र असल्याने प्रत्येक भाषेसाठी स्वतंत्र प्रवेशिका पाठवावी.
   7. स्पर्धेसाठी युवा महोत्सव समितीने ठरविलेले/निवडलेले 5 विषय स्पर्धेच्या आधी कळविले जातील व त्यामधूनच स्पर्धकास विषय स्वतः निवडता येईल.
4. सुगम गायन :
   1. स्पर्धेसाठी एका महाविद्यालयातून फक्त एकाच स्पर्धकाला भाग घेता येईल.
   2. ही स्पर्धा आभासी पध्दतीने घेण्यात येईल.
   3. प्रत्येक स्पर्धकाने कॅमे—यासमोर बसूनच आपली कलाकृती सादर करावी.
   4. प्रत्येक स्पर्धकाला जास्तीत जास्त दोन साथीदार बरोबर घेता येईल.
   5. प्रत्येक गायकाला किमान 4 मिनिटांचा व कमाल 6 मिनिटांचा वेळ दिला जाईल.

6. स्पर्धकास जास्तीत जास्त 15 सेकंद अधिकचा वेळ मान्य करण्यात येईल. त्यापेक्षा अधिकचा वेळ लागल्यास स्पर्धक स्पर्धेतून बाद केला जाईल.
7. या स्पर्धेत भावगीत, भक्तीगीत, भजन, गझल आणि अभंग इ.सादर करता येईल.
8. स्पर्धेचा निर्णय गीताची निवड, स्वर, सादरीकरण, आणि एकूण परिणाम यावर अवलंबून राहील.
9. स्पर्धकांना गायनासाठी साथिदाराऐवजी रेकॉर्डेड संगीत (Minus Track) किंवा इलेक्ट्रॉनिक्स वाद्य यांचा वापर करता येईल.

**5. शास्त्रीय गायन :**

1. स्पर्धेसाठी एका महाविद्यालयातील फक्त एका स्पर्धकास भाग घेता येईल.
2. ही स्पर्धा आभासी पध्दतीने घेण्यात येईल.
3. प्रत्येक स्पर्धकाने कॅमे–यासमोर बसूनच आपली कलाकृती सादर करावी.
4. स्पर्धकाला आपल्या बरोबर जास्तीत जास्त 2 साथीदार घेता येतील.
5. प्रत्येक गायकाला किमान 8 मिनिटांचा व कमाल 10 मिनिटांचा वेळ दिला जाईल.
6. जास्तीत जास्त 15 सेकंदांचा अधिकचा वेळ मान्य करण्यात येईल त्यापेक्षा अधिकचा वेळ झाल्यास स्पर्धक स्पर्धेतून बाद होईल.
7. या स्पर्धेत फक्त हिंदूस्तानी संगीतातील राग सादर करता येतील.
8. स्पर्धेचे मुल्यमापन गीताची निवड, स्वर, सादरीकरण आणि एकूण परिणाम यावर अवलंबून राहील.
9. स्पर्धकांना सादरीकरणासाठी लेह–याचे इलेक्ट्रानिक्स संगीत किंवा तबला इलेक्ट्रॉनिक वाद्य अथवा रेकॉर्डेड संगीत (Minus Track) यांचा वापर करता येईल

**7. पाश्चिमात्य एकल गायन :**

1. स्पर्धेसाठी प्रत्येक महाविद्यालयातील फक्त एका स्पर्धकास भाग घेता येईल.
2. ही स्पर्धा आभासी पध्दतीने घेण्यात येईल.
3. प्रत्येक स्पर्धकाने कॅमे–यासमोरच आपली कलाकृती सादर करावी.
4. स्पर्धकाला आपल्या बरोबर जास्तीत जास्त 2 साथिदार घेता येतील. (साथिदाराऐवजी प्रसंगी पूर्वध्वनीमुद्रीत रेकॉर्डेड संगीताचा वापर करता येईल.)
5. प्रत्येक गायकाला किमान 4 मिनिटांचा कमाल 6 मिनिटांचा वेळ दिला जाईल. यामध्ये स्पर्धकाला कितीही गाणी सादर करता येतील.
6. जास्तीत जास्त 15 सेकंदांचा अधिकचा वेळ मान्य करण्यात येईल, त्यापेक्षा अधिकचा वेळ झाल्यास स्पर्धक स्पर्धेतून बाद होईल.
7. स्पर्धेचे मुल्यमापन गीताची निवड, स्वर, सादरीकरण आणि एकूण परिणाम यावर अवलंबून राहील.
8. स्पर्धकांना गायनासाठी साथिदाराऐवजी रेकॉर्डेड संगीत (Minus Track) किंवा इलेक्ट्रॉनिक वाद्य यांचा वापर करता येईल

**7. शास्त्रीय सूरवाद्य :**

1. स्पर्धेसाठी एका महाविद्यालयातील फक्त एका स्पर्धकास भाग घेता येईल.
2. ही स्पर्धा आभासी पध्दतीने घेण्यात येईल.
3. प्रत्येक स्पर्धकाने कॅमे–यासमोर बसूनच आपली कलाकृती सादर करावी.
4. सुर वाद्यामध्ये सतार, सरोद, व्हायोलिन, हार्मोनियम व बासरी इत्यादी वाद्यांचा समावेश आहे.
5. स्पर्धेसाठी इलेक्ट्रॉनिक तबला वापरता येईल.
6. भाग घेणाऱ्या स्पर्धकाना आपल्या बरोबर जास्तीत जास्त दोन साथीदार घेता येतील.
7. स्पर्धकास किमान 8 मिनिटांचा व कमाल 10 मिनिटांचा वेळ दिला जाईल.
8. जास्तीत जास्त 15 सेकंदांचा अधिकचा वेळ मान्य करण्यात येईल, त्यापेक्षा अधिकचा वेळ झाल्यास स्पर्धक स्पर्धेतून बाद होईल.
9. स्पर्धेचे मुल्यमापन लय, ताल, सुरेलपणा व सादरीकरण इ. बाबीवर अवलंबून राहील.
10. पाश्चिमात्य वादयाचा यात समावेश नसावा.

8. **शास्त्रीय तालवाद्य :**

1. स्पर्धेसाठी एका महाविद्यालयातील फक्त एका स्पर्धकास भाग घेता येईल.
2. ही स्पर्धा आभासी पध्दतीने घेण्यात येईल.
3. प्रत्येक स्पर्धकाने कॅमे—यासमोर बसूनच आपली कलाकृती सादर करावी.
4. या स्पर्धेसाठी तबला, मृदुगंम, पखवाज व घट्टम इत्यादी वाद्यांचा समावेश असावा.
5. स्पर्धेसाठी इलेक्ट्रॉनिक तबला वापरता येईल.
6. भाग घेणाऱ्या स्पर्धकाना आपल्या बरोबर जास्तीत जास्त दोन साथीदार घेता येतील.
7. स्पर्धकास किमान 8 मिनिटांचा व कमाल 10 मिनिटांचा वेळ दिला जाईल.
8. जास्तीत जास्त 15 सेकंदांचा अधिकचा वेळ मान्य करण्यात येईल, त्यापेक्षा अधिकचा वेळ झाल्यास स्पर्धक स्पर्धेतून बाद होईल.
9. स्पर्धेचे मुल्यमापन लय, ताल, सुरेलपणा व सादरीकरण इ. बाबीवर अवलंबून राहील.

9. **पाश्चिमात्य एकल वादयवादन :**

1. स्पर्धेसाठी एका महाविद्यालयातून फक्त एकाच स्पर्धकास भाग घेता येईल.
2. ही स्पर्धा आभासी पध्दतीने घेण्यात येईल.
3. प्रत्येक स्पर्धकाने कॅमे—यासमोरच आपली कलाकृती सादर करावी.
4. स्पर्धेत पाश्चिमात्य स्वरवाद्य किंवा तालवाद्य याचा वापर करुन पाश्चिमात्य संगीत सादर करता येईल.
5. स्पर्धेसाठी किमान 6 मिनिटे व कमाल 8 मिनिटे वेळ दिला जाईल.
6. जास्तीत जास्त 15 सेकंदांचा अधिकचा वेळ मान्य करण्यात येईल, यापेक्षा अधिकचा वेळ झाल्यास स्पर्धक स्पर्धेतून बाद होईल.
7. साथिदारांची संख्या जास्तीत जास्त 2 असेल. साथीदारांऐवजी Minus Track वापरता येईल.

10. **शास्त्रीय नृत्य :**

1. स्पर्धेसाठी एका महाविद्यालयातील फक्त एका स्पर्धकास भाग घेता येईल.
2. ही स्पर्धा आभासी पध्दतीने घेण्यात येईल.
3. प्रत्येक स्पर्धकाने कॅमे—यासमोरच आपली कलाकृती सादर करावी.
4. स्पर्धकास आपल्या बरोबर जास्तीत जास्त तीन साथीदार घेता येतील (साथीदाराऐवजी प्रसंगी पूर्व ध्वनिमुद्रीत/रेकार्डेड संगीताचा वापर करता येईल)
5. भरत नाटयम, कथ्थक, कुचिपुडी, मोहिण्णीअट्टम, ओडिसी, कथकली किंवा मणिपुरी या नृत्यापैकी एक नृत्य प्रकारचा अविष्कार स्पर्धकास किमान 12 मिनिटे व कमाल 15 मिनिटे दाखविता येईल.
6. जास्तीत जास्त 15 सेकंदाचा अधिकचा वेळ मान्य करण्यात येईल, त्यापेक्षा अधिकचा वेळ झाल्यास स्पर्धक स्पर्धेतून बाद होईल.

11. **नकला :**

1. स्पर्धेसाठी महाविद्यालयातील फक्त एका स्पर्धकास भाग घेता येईल.
2. ही स्पर्धा आभासी पध्दतीने घेण्यात येईल.
3. प्रत्येक स्पर्धकाने कॅमे—यासमोरच आपली कलाकृती सादर करावी.
4. प्रत्येक स्पर्धकाला किमान 4 मिनिटे व कमाल 5 मिनिटे वेळ दिला जाईल. जास्तीत जास्त 15 सेकंदाचा अधिकचा वेळ मान्य करण्यात येईल.
5. स्पर्धकास विविध आवाजाची व प्रसिध्द व्यक्तीच्या भाषणाची नक्कल करता येईल. यामध्ये चित्रपट सृष्टीतील व्यक्तीमत्वांचाही समावेश राहील.
6. स्पर्धेचे मुल्यमापन नक्कल कौशल्य, आवाजाची विविधता, शब्दोच्चाराचे अनुकरण व सादरीकरण यावर राहील.

12. **एकपात्री अभिनय (मराठी, हिंदी आणि इंग्रजी) :**

1. स्पर्धेसाठी एका महाविद्यालयातील फक्त एका स्पर्धकास भाग घेता येईल.
2. ही स्पर्धा आभासी पध्दतीने घेण्यात येईल.

3. प्रत्येक स्पर्धकाने कॅमे–यासमोरच आपली कलाकृती सादर करावी.
4. प्रत्येक स्पर्धकाला किमान 4 मिनिटे व कमाल 5 मिनिटे वेळ दिला जाईल.
5. स्पर्धेचा विषय स्वतः निवडावा (स्वरचित एकपात्री प्रयोग किंवा नाटकातील उतारा सादर करता येईल).
6. स्पर्धेचे मुल्यमापन विषयाची समर्पकता, त्वरीत मिळालेली प्रतिक्रिया व अभिनय इ. बाबींवर अवलंबून राहील.
7. स्पर्धेमध्ये मराठी, हिंदी तसेच इंग्रजी भाषेचा वापर करता येईल.

13. व्यंग चित्र :

1. स्पर्धेसाठी प्रत्येक महाविद्यालयातील फक्त एका स्पर्धकास भाग घेता येईल.
2. ही स्पर्धा आभासी पध्दतीने घेण्यात येईल.
3. प्रत्येक स्पर्धकाने कॅमे–यासमोर बसूनच आपली कलाकृती सादर करावी.
4. स्पर्धेचा विषय स्पर्धेच्या वेळीच देण्यात येईल.
5. प्रत्येक स्पर्धकाला किमान 2 तासांचा वेळ दिला जाईल.
6. स्पर्धेसाठी वापरण्यात येणारा पेपर हा 20 इंच बाय 15 इंच इतका असावा. (Half Imperial Size).
7. स्पर्धकांनी तयार झालेल्या व्यंग्यचित्राचा फोटो **dsw@unishivaji.ac.in** या ई–मेल आयडी वरती पाठवून दयावा.

14. भित्तीचित्र निर्मिती :

1. स्पर्धेसाठी एका महाविद्यालयातील फक्त एका स्पर्धकास भाग घेता येईल.
2. ही स्पर्धा आभासी पध्दतीने घेण्यात येईल.
3. प्रत्येक स्पर्धकाने कॅमे–यासमोर बसूनच आपली कलाकृती सादर करावी.
4. स्पर्धेचा विषय स्पर्धेच्या वेळीच देण्यात येईल.
5. प्रत्येक स्पर्धकाला किमान 2 तासांचा वेळ दिला जाईल.
6. स्पर्धेसाठी वापरण्यात येणारा पेपर हा 20 इंच बाय 15 इंच इतका असावा (Half Imperial Size).
7. स्पर्धकांनी चित्र काढण्याठी पाण्याचे कलर (Water Colours) किंवा पोस्टर कलर (Poster Colours) यांचा वापर करावा.
8. स्पर्धकांनी तयार झालेल्या भित्तीचित्राचा फोटो **dsw@unishivaji.ac.in** या ई–मेल आयडी वरती पाठवून दयावा.

15. स्थळ चित्र :

1. स्पर्धेसाठी एका महाविद्यालयातील फक्त एका स्पर्धकास भाग घेता येईल.
2. ही स्पर्धा आभासी पध्दतीने घेण्यात येईल.
3. प्रत्येक स्पर्धकाने कॅमे–यासमोर बसूनच आपली कलाकृती सादर करावी.
4. स्पर्धेचा विषय स्पर्धेच्या वेळीच देण्यात येईल.
5. प्रत्येक स्पर्धकाला किमान 2 तासांचा वेळ दिला जाईल.
6. स्पर्धेसाठी वापरण्यात येणारा पेपर हा 20 इंच बाय 15 इंच इतका असावा. (Half Imperial Size)
7. स्पर्धकांनी चित्र काढण्याठी ऑईल, पाण्याचे कलर (Water Colours) किंवा पोस्टर कलर (Poster Colours) यांचा वापर करावा.
8. स्पर्धकांनी तयार झालेल्या स्थळचित्राचा फोटो **dsw@unishivaji.ac.in** या ई–मेल आयडी वरती पाठवून दयावा.

16. कातर काम :

1. स्पर्धेसाठी एका महाविद्यालयातील फक्त एका स्पर्धकास भाग घेता येईल.
2. ही स्पर्धा आभासी पध्दतीने घेण्यात येईल.
3. प्रत्येक स्पर्धकाने कॅमे–यासमोर बसूनच आपली कलाकृती सादर करावी.
4. स्पर्धेच्या वेळीच वस्तुची निर्मिती करावयाची आहे. विषय स्पर्धेच्या वेळीच दिला जाईल.
5. प्रत्येक स्पर्धकाला किमान 2 तासाचा वेळ दिला जाईल.
6. स्पर्धेसाठी वापरण्यात येणारा पेपर हा 20 इंच बाय 15 इंच इतका असावा. (Half Imperial Size)
7. स्पर्धकांनी तयार झालेल्या कलाकृतीचा फोटो **dsw@unishivaji.ac.in** या ई–मेल आयडी वरती पाठवून दयावा.

17. माती काम / मातीपासून प्रतिकृती निर्मिती

1. स्पर्धेसाठी एका महाविद्यालयातील फक्त एका स्पर्धकास भाग घेता येईल.
2. ही स्पर्धा आभासी पध्दतीने घेण्यात येईल.
3. प्रत्येक स्पर्धकाने कॅमे–यासमोर बसूनच आपली कलाकृती सादर करावी.
4. स्पर्धेचा विषय स्पर्धेच्या वेळीच देण्यात येईल.
5. प्रत्येक स्पर्धकाला किमान 2 तासांचा वेळ दिला जाईल.
6. स्पर्धकांनी तयार झालेल्या कलाकृतीचा फोटो **dsw@unishivaji.ac.in** या ई–मेल आयडी वरती पाठवून दयावा.

18. रांगोळी :

1. स्पर्धेसाठी एका महाविद्यालयातील फक्त एका स्पर्धकास भाग घेता येईल.
2. ही स्पर्धा आभासी पध्दतीने घेण्यात येईल.
3. प्रत्येक स्पर्धकाने कॅमे–यासमोर बसूनच आपली कलाकृती सादर करावी.
4. स्पर्धेचा विषय स्पर्धेच्या वेळीच देण्यात येईल.
5. प्रत्येक स्पर्धकाला किमान 2 तासांचा वेळ दिला जाईल.
6. स्पर्धेतील रांगोळीची दृश्य रचना, मुक्तहस्त, वर्णनात्मक व हेतु व्यक्त होणारी असावी (यामध्ये संस्कार भारती प्रकारची रांगोळी असू नये).
7. बाकीच्या सुचना स्पर्धेच्या वेळी देण्यात येतील.
8. स्पर्धकांनी तयार झालेल्या रांगोळीचा फोटो **dsw@unishivaji.ac.in** या ई–मेल आयडी वरती पाठवून दयावा.
9. रांगोळीचा आकार हा 4 फूट बाय 4 फूट असावा.

19. मेहेंदीः

1. स्पर्धेसाठी एका महाविद्यालयातील फक्त एका स्पर्धकास भाग घेता येईल.
2. ही स्पर्धा आभासी पध्दतीने घेण्यात येईल.
3. प्रत्येक स्पर्धकाने कॅमे–यासमोर बसूनच आपली कलाकृती सादर करावी.
4. स्पर्धेसाठी 2 तासांचा कालावधी देण्यात येईल.
5. मेहेंदी ही तळहातापासून ते दोन्ही हाताच्या पुढील बाजूला जास्तीत जास्त सहा इंचापर्यंत काढावी.
6. मेहेंदी रचनेसाठी सोबत ज्याच्या हातावर ती रचना करावयाची आहे अशा व्यक्तीची निवड विद्यार्थ्यांनी स्वतः करावयाची आहे.
7. कोणत्याही प्रकारचे तयार ठसे किंवा उपकरणे वापरता येणार नाहीत.
8. मेहेंदी रचनेचे परिक्षण हे रेखीव, पारंपारिक व आकर्षकता या तत्वांवर केले जाईल.
9. स्पर्धकांनी तयार झालेल्या मेहंदीचा फोटो **dsw@unishivaji.ac.in** या ई–मेल आयडी वरती पाठवून दयावा.

# ऑनलाईन युवा महोत्सवात आयोजित केल्या जाणाऱ्या स्पर्धांची संक्षिप्त माहिती

| अ.क्र. | स्पर्धा | स्पर्धक (कमाल) | साथीदार (कमाल) | किमान वेळ | कमाल वेळ | अधिकचा वेळ |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | वक्तृत्व मराठी | 1 (एक) | तरतुद नाही | 4 मिनीटे | 5 मिनीटे | 15 सेकंद |
| 2 | वक्तृत्व हिंदी | 1 (एक) | तरतुद नाही | 4 मिनीटे | 5 मिनीटे | 15 सेकंद |
| 3 | वक्तृत्व इंग्रजी | 1 (एक) | तरतुद नाही | 4 मिनीटे | 5 मिनीटे | 15 सेकंद |
| 4 | सुगमगायन | 1 (एक) | 2 (दोन) | 4 मिनिटे | 6 मिनिटे | 15 सेकंद |
| 5 | शास्त्रीय गायन | 1 (एक) | 2 (दोन) | 8 मिनिटे | 10 मिनिटे | 15 सेकंद |
| 6 | पाश्चिमात्य एकल गायन | 1 (एक) | 2 (दोन) | 4 मिनिटे | 6 मिनिटे | 15 सेकंद |
| 7 | शास्त्रीय सुरवाद्य | 1 (एक) | 2 (दोन) | 8 मिनिटे | 10 मिनिटे | 15 सेकंद |
| 8 | शास्त्रीय तालवाद्य | 1 (एक) | 2 (दोन) | 8 मिनिटे | 10 मिनिटे | 15 सेकंद |
| 9 | पाश्चिमात्य एकल वाद्यवादन | 1 (एक) | 2 (दोन) | 6 मिनिटे | 8 मिनिटे | 15 सेकंद |
| 10 | शास्त्रीय नृत्य | 1 (एक) | 3 (तीन) | 12 मिनिटे | 15 मिनिटे | 15 सेकंद |
| 11 | नकला | 1 (एक) | तरतुद नाही | 4 मिनीटे | 5 मिनीटे | 15 सेकंद |
| 12 | एकपात्री अभिनय | 1 (एक) | तरतुद नाही | 4 मिनीटे | 5 मिनीटे | 15 सेकंद |
| 13 | व्यंग चित्र | 1 (एक) | तरतुद नाही | दोन तास | दोन तास | तरतुद नाही |
| 14 | भित्तीचित्र निर्मिती | 1 (एक) | तरतुद नाही | दोन तास | दोन तास | तरतुद नाही |
| 15 | स्थळ चित्र | 1 (एक) | तरतुद नाही | दोन तास | दोन तास | तरतुद नाही |
| 16 | कातरकाम | 1 (एक) | तरतुद नाही | दोन तास | दोन तास | तरतुद नाही |
| 17 | माती काम/माती पासून प्रतिकृती निर्मिती | 1 (एक) | तरतुद नाही | दोन तास | दोन तास | तरतुद नाही |
| 18 | रांगोळी | 1 (एक) | तरतुद नाही | दोन तास | दोन तास | तरतुद नाही |
| 19 | मेहेंदी रचना | 1 (एक) | 1 (एक) | दिड तास | दोन तास | तरतुद नाही |

❖ साथीदाराऐवजी Minus Track किंवा Electronic Machine किंवा Recorded Track वापरता येईल

# ऑनलाईन मध्यवर्ती युवा महोत्सव

विद्यार्थी विकास विभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर तर्फे संपन्न झालेल्या ऑनलाईन जिल्हास्तरीय युवा महोत्सवातील स्पर्धांमधून गुणानुक्रमे निवड झालेल्या स्पर्धकांसाठी ऑनलाईन मध्यवर्ती युवा महोत्सवाचे आयोजन करण्यात येत आहे.

**ऑनलाईन मध्यवर्ती युवा महोत्सवासाठी सूचना आणि नियमावली :**

1. ऑनलाईन जिल्हास्तरीय स्पर्धेत गुणानुक्रमे तीन क्रमांक पटकावलेल्या स्पर्धकांना ऑनलाईन मध्यवर्ती युवा महोत्सवामध्ये थेट प्रवेश देण्यात येईल. त्यामुळे या स्पर्धांसाठी पुनःश्च प्रवेशिका पाठविण्याची गरज नाही.
2. ऑनलाईन जिल्हास्तरीय स्पर्धांचे नियम ऑनलाईन मध्यवर्ती युवा महोत्सवाच्या स्पर्धांना लागू करण्यात येतील

## ऑनलाईन युवा महोत्सव विभागानुसार कलाप्रकार यादी

| अ.क्र. | कलाप्रकार | विभाग |
|---|---|---|
| 1. | मराठी वक्तृत्व | वाङमय |
| 2. | हिंदी वक्तृत्व | |
| 3. | इंग्रजी वक्तृत्व | |
| 4. | सुगमगायन | संगीत |
| 5. | शास्त्रीय गायन | |
| 6. | पाश्चिमात्य एकल गायन | |
| 7. | शास्त्रीय सुरवाद्य | |
| 8. | शास्त्रीय तालवाद्य | |
| 9. | पाश्चिमात्य एकल वाद्य वादन | |
| 10. | शास्त्रीय नृत्य | नृत्य |
| 11. | नकला | नाटय |
| 12. | एकपात्री अभिनय | |
| 13. | व्यंगचित्र | कला |
| 14. | भित्तीचित्र | |
| 15. | स्थळ चित्र | |
| 16. | कातरकाम | |
| 17. | मातीकाम | |
| 18. | रांगोळी | |
| 19. | मेहंदी | |

# ऑनलाईन स्पर्धा सर्वसाधारण विजेतेपद (Overall Championship) नियमावली

सर्वसाधारण विजेतेपद (Overall Championship) हे सर्वाधिक गुण संपादन करणाऱ्या महाविद्यालयाला दिले जाईल. याबाबत गुणांकणाचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ .क्र. | क्रमांक | गुण |
|---|---|---|
| 1 | प्रथम कमांक | 5 गुण |
| 2 | व्दितीय कमांक | 3 गुण |
| 3 | तृतीय कमांक | 1 गुण |

1. विलिंग्डन महाविद्यालय शताब्दी महोत्सव विभागवार विजेतेपद (Section Wise General Championship) त्या त्या कला विभागामध्ये सर्वाधिक गुण संपादन करणाऱ्या महाविद्यालयास दिले जाईल.
2. युवा महोत्सवाचे सर्वसाधारण विजेतेपद (GENERAL CHAMPIONSHIP) ठरविताना संबंधित महाविद्यालयाच्या विजेत्या संघांनी वरीलप्रमाणे मिळवलेले एकत्र गुण विचारात घेतले जातील.
3. युवा महोत्सवाचे सर्वसाधारण विजेतेपद पटकवणाऱ्या महाविद्यालयाला **'माजी कुलगुरु स्व. आप्पासाहेब पवार चांदीचा फिरता चषक'** दिला जाईल.
4. सदर चषक वर्षभर विजेत्या महाविद्यालयाकडे राहील. विजेतेपद विभागून दिले गेल्यास चषक एका सत्रासाठी एका महाविद्यालयाकडे आणि दुसऱ्या सत्रासाठी दुसऱ्या महाविद्यालयाकडे राहील.
5. विजेतेपद मिळवणाऱ्या महाविद्यालयाला आपल्याकडील चषकावर आपल्या महाविद्यालयाचे नाव लिहिता अथवा कोरता येणार नाही.
6. विजेतेपद मिळवणाऱ्या महाविद्यालयांने आपल्याकडील चषक स्वतः कार्यालयीन सुचनेनुसार संचालक, विद्यार्थी विकास, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांच्या कार्यालयामध्ये सुस्थितीमध्ये पोहोच करणे बंधनकारक आहे.

संपर्क –
ऑफिस : 0231–2609175, 2609475

संचालक,
विद्यार्थी विकास
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
विद्यार्थी विकास विभाग
ऑनलाईन युवा महोत्सव 2020–2021
सहभाग नोंदणी अर्ज

महाविद्यालयाचे नावः– ––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––
संघव्यवस्थापकाचे नाव / 1) ––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––
मोबाईल नंबर / ईमेल 2) ––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––

| अं. कं | कला प्रकार | सहभागी विद्यार्थी / स्पर्धकाचे नाव | जन्मतारीख | वर्ग | मोबाईल नंबर | ई–मेल |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | वक्तृत्व मराठी | | | | | |
| 2 | वक्तृत्व हिंदी | | | | | |
| 3 | वक्तृत्व इंग्रजी | | | | | |
| 4 | सुगम गायन | | | | | |
| 5 | शास्त्रीय गायन | | | | | |
| 6 | पाश्चिमात्य एकल गायन | | | | | |
| 7 | शास्त्रीय सुरवाद्य | | | | | |
| 8 | शास्त्रीय तालवाद्य | | | | | |
| 9 | पाश्चिमात्य एकल वाद्यवादन | | | | | |
| 10 | शास्त्रीय नृत्य | | | | | |
| 11 | नकला | | | | | |
| 12 | एकपात्री अभिनय | | | | | |
| 13 | व्यंगचित्र | | | | | |
| 14 | भित्तीचित्र | | | | | |
| 15 | स्थळचित्र | | | | | |
| 16 | कातरकाम | | | | | |
| 17 | मातीकाम | | | | | |
| 18 | रांगोळी | | | | | |
| 19 | मेहंदी | | | | | |

प्रमाणित करण्यात येते की, वरीलप्रमाणे नोंदणी केलेले स्पर्धक हे आमच्या महाविद्यालयाचे नियमित विद्यार्थी आहेत.

संघव्यवस्थापक
सही

मा. प्राचार्य
सही व शिक्का